पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक ५
सभावृत्तांत

दिनांक:- ०८/०७/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.“फ” प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०८/०७/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता “फ” क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.तानाजी विठठल खाडे | सभापती |
| २. | मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनावणे | सदस्य |
| ३. | मा. भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू | सदस्य |
| ४. | मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ | सदस्य |
| ५. | मा. भालेकर अरुणा दिलीप | सदस्य |
| ६. | मा. जाधव साधना रामदास | सदस्य |
| ७. | मा.जाधव राहुल गुलाब | सदस्य |
| ८. | मा. पवार संगीता शाम | सदस्य |
| ९. | मा.बो-हाडे शुभांगी संजय | सदस्य |
| १०. | मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित | सदस्य |
| ११. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १२. | मा.भालेकर पंकज दत्तात्रय | स्विकृत सदस्य |
| १३. | मा.पवार जितेंद्र हनुमंत | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री. मनोज लोणकर (प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी), श्री. लडकत प्रविण (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा ) श्रीमती. प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक), श्री. प्रदीप पुजारी (प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू), श्री. कदम पी.जे.(लेखाधिकारी), श्री. गायकवाड शहाजी ( उपअभियंता स्थापत्य), श्री. किशोर महाजन ( उपअभियंता पाणीपुरवठा), श्री. शिंदे एच. एस. ( उपअभियंता जलनि:सारण), श्री. अभिमान भोसले( कनिष्ठ अभियंता स्थापत्य), श्री. अडसुळ ( उपअभियंता विदयुत) श्री. गायकवाड जे.जे. (मुख्य आरोग्य निरीक्षक ) श्री. अतुल जोशी (कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा), जाधव एस.एस. (कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा), श्री. गायकवाड टी.डी. (हार्टी सुपरवायझर), श्री. घोडे एस.जी. (उदयान सहाय्यक), श्री. तुकाराम गिरमकर मुख्य लिपीक, श्री.माने एस.ए. (आरोग्य निरीक्षक) इ. अधिकारी सभेस हजर होते.

**मा. सभाध्यक्ष मा. सौ. मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांचे अनुपस्थित सभाध्यक्ष पद मा. तानाजी विठठल खाडे यांनी स्विकारणेबाबत नगरसदस्य जाधव राहुल गुलाब यांनी सूचीत करुन मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित यांनी अनुमोदन दिले. मा. तानाजी विठठल खाडे यांनी सभाध्यक्ष पद स्विकारुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.**

अ. कार्यपत्रिका क्रमांक ४ दिनांक १०/०६/२०१६ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**मा. सभापती यांचे संमतीने खालील प्रमाणे विषय ऐनवेळी सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र. १** प्रभाग क्र. २८ टेल्को सीमा भिंत लगतचा रोड (W सेक्टर) ते मोरवाडी आय.टी.आय. रस्ता ( सर्वे १३९/१४० येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा) म.न.पा. अधिनियम २००५ मधील कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणुन घोषित करणेबाबत.

मा. मासुळकर समीर मोरेश्वर व मा. भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. २** प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण मध्ये विविध नामकरणाचे फलक पुढीलप्रमाणे लावणेबाबत.

१.निगडी जकात नाक्याजवळील नविन आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक होत असुन तेथील प्रवेशद्वारास " **साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक** " असे नामकरण करणे.

२. आरोग्य निरीक्षक कार्यालय येथील चौकास " **लक्ष्मीबाई भीमाजी काळभोर (पाटील) लक्ष्मीनगर चौक** " असे नामकरण करणे.

मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित व मा. भालेकर अरुणा दिलीप यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ३** प्रभाग क्र. १ हददीतील त्रिवेणीनगर-तळवडे रोड येथील बसस्टॉप ला "**करवीर बसस्टॉप** " तसेच तेथील चौकास "**करवीर चौक** " असे नामकरण करणे.

मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे व मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ४** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी मधील हेडगेवार क्रीडा संकुल येथे दिनांक १/०५/२०१६ रोजी झालेल्या माजी महापौर कै. भिकू वाघेरे पाटील ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डींग स्पर्धा २०१६-२०१७ या स्पर्धेकरिता मंडप व्यवस्थेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९,९०,०००/- इतकी येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अनिपयम अनुसूची ड प्रकरण ५ (२) २ नुसार कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेपर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा कार्यकारी अभियंता, स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालय यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ५** प्रभाग क्र. ११ व १२ (सेक्टर नं २१ व २२) येथील चिकनचौकामध्ये गतिरोधक बसविणेबाबत.

मा.बो-हाडे शुभांगी संजय व मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ६** प्रभाग क्र. ५ कुदळवाडी- जाधववाडी मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर आराखडयातील गट नं ६८० मधील १२ मीटर रस्ता हा जुन्या ग्रामपंचायत हददीतील वहिवाटीचा रस्ता मनपा ने केलेला आहे. सदर रस्त्यामुळे लोकांचे नुकसान होत असल्याने रदद करुन जुना वहिवाटीचा १२मी. चा रस्ता करुन तोच वापर करण्यासाठी मंजुरी देणेबाबत.

मा. राहुल गुलाब जाधव यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ८ विषय क्र. १
दि. ०८/०७/२०१६ विभाग –
सुचक:- मा. समिर मासुळकर अनुमोदक:- मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा. मासुळकर समीर मोरेश्वर व मा. भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू यांचा दि. ०५/७/२०१६ चा प्रस्ताव.

**विषय -** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथील भाग अत्याधुनिक सोयीने विकसीत होत असून, नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने व मुख्य रस्त्यावर होणा-या गाडयाच्या वाहतुकीस पर्यायी उपलब्धता होणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रभाग क्र. २८ टेल्को सीमा भिंत लगतचा रोड (W सेक्टर) ते मोरवाडी आय.टी.आय. रस्ता ( सर्वे १३९/१४० येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा) म.न.पा. अधिनियम २००५ मधील कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणुन घोषित करणे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ९ विषय क्र. २
दि. ०८/०७/२०१६ विभाग –
सुचक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित अनुमोदक:- मा. अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित व मा. भालेकर अरुणा दिलीप यांचा दि. ०८/७/२०१६ चा प्रस्ताव.

**विषय-** प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण मध्ये विविध नामकरणाचे फलक पुढीलप्रमाणे लावणेबाबत.

१.निगडी जकात नाक्याजवळील नविन आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक होत असुन तेथील प्रवेशद्वारास **"साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक"** असे नामकरण करणे.

२. आरोग्य निरीक्षक कार्यालय येथील चौकास **" लक्ष्मीबाई भीमाजी काळभोर (पाटील) लक्ष्मीनगर चौक "** असे नामकरण करणे.

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

ठराव क्र. १० विषय क्र. ३

दि. ०८/०७/२०१६ विभाग –

सुचक:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

संदर्भ:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा. अरुणा भालेकर यांचा दि. ०८/७/२०१६ चा प्रस्ताव.

**विषय-** प्रभाग क्र. १ हददीतील त्रिवेणीनगर-तळवडे रोड येथील बसस्टॉप ला **"करवीर बसस्टॉप "** तसेच तेथील चौकास **"करवीर चौक "** असे नामकरण करणे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ११ विषय क्र. ४

दि. ०८/०७/२०१६ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक:- मा. अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. अरुणा भालेकर

संदर्भ:- स्थापत्य विभागाकडील विषयपत्र क्र. फक्षेका/स्था/६२९/१६ दि. ०८/७/२०१६.

**विषय -** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी मधील हेडगेवार क्रीडा संकुल येथे दिनांक १/०५/२०१६ रोजी झालेल्या माजी महापौर कै. भिकू वाघेरे पाटील ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डींग स्पर्धा २०१६-२०१७ या स्पर्धेकरिता मंडप व्यवस्था मैदान तैयार करणे स्टेज तसेच खेळाडूंसाठी राहण्याची, खुर्च्या टेबल, मंडप इ . कामाची व्यवस्था पुरविणेकामी खर्च अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९,९०,०००/- इतकी येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ (२) २ नुसार प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९,९०,०००/- पर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता मिळणेबाबच्या प्रस्तावास मंजुरी देणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. १२ विषय क्र. ५

दि. ०८/०७/२०१६ विभाग –

सुचक:- मा.बो-हाडे शुभांगी संजय अनुमोदक:- मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे

संदर्भ:- मा.बो-हाडे शुभांगी संजय व मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे यांचा दि. ०८/७/२०१६ चा प्रस्ताव.

**विषय** प्रभाग क्र. ११ व १२ (सेक्टर नं २१ व २२) येथील चिकनचौकामध्ये रहदारी असते व येथे वारंवार अपघात होत असतात सबब चिकनचौकात गतिरोधक बसविणेचा ठराव मंजुर करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. १३ विषय क्र. ६

दि. ०८/०७/२०१६ विभाग –

सुचक:- मा. सुरेश म्हेत्रे अनुमोदक:- मा. शांताराम भालेकर

संदर्भ:- मा. राहुल गुलाब जाधव यांचा दि. ०५/७/२०१६ चा प्रस्ताव.

**विषय-** प्रभाग क्र. ५ कुदळवाडी- जाधववाडी मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर आराखडयातील गट नं ६८० मधील १२ मीटर रस्ता हा जुन्या ग्रामपंचायत हददीतील वहिवाटीचा रस्ता मनपा ने केलेला आहे. सदर रस्त्यामुळे लोकांचे नुकसान होत असल्याने रदद करुन जुना वहिवाटीचा १२मी. चा रस्ता करुन तोच वापर करण्यासाठी मंजुरी देणेबाबत.

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(तानाजी विठठल खाडे)
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक:- फक्षेका/सभा/कावि/२७६ /२०१६

दिनांक:- १३/०७/२०१६

सही/-
(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय